# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ८ वा ❑ मंगळवार दि.०४ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## गर्दी व्यवस्थापन धोरणांचा पुनर्विचार व्हावा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य



महाकुंभ मेळ्यातील चेंगराचेंगरीच्या दुःखद घटनेमुळे धार्मिक तीर्थस्थळांवरील गर्दी व्यवस्थापन धोरणांचा पुनर्विचार करण्याची गरज परत एकदा निर्माण झाली आहे. तिरुपतीतील तिरुमला मंदिरात झालेल्या दुःखद घटनानंतर कुंभ मेळ्यात चेंगराचेंगरी होवून अनेक भक्तांना आपल्या प्राणास मुकावे लागले.. धार्मिक स्थळावर होणारी गर्दी आज चिंतेचा व चिंतनाचा विषय झाले आहे कितीही सुरक्षा असेल तरीही भक्त गर्दी करतात आणि यातूनच भक्तांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर परत एकदा धार्मिक स्थळांच्या सुरक्षेची नव्याने विचार करण्याची गरज आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या आकडेवारीनुसार, १९९६ ते २०२२ दरम्यान देशभरातील धार्मिक स्थळांवर झालेल्या चेंगराचेंगरीत ३,००० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीडी) आणि आंध्र प्रदेश सरकारने केलेल्या विस्तृत व्यवस्था असूनही, तिरुपती चेंगराचेंगरीत सहा भाविकांचा मृत्यू झाला आणि ४० हून अधिक जण जखमी झाले. १० दिवसांच्या वैकुंठ द्वार दर्शनाचे नियंत्रण करण्यासाठी एक विस्तृत यंत्रणा अस्तित्वात होती, जसे की साप्ताहिक गेल बँक धोरण आणि त्यात ३,००० हून अधिक पोलिस कर्मचारी आणि इतर स्वयंसेवकांचा समावेश होता. तथापि, शहरातील एका केंद्रावर, भाविकांची गर्दी जमली आणि गोंधळामुळे घबराट आणि गोंधळ निर्माण झाला.

कुंभमेळ्यात देखील पोलीस बंदोबस्त सुरक्षा व्यवस्था तगडी असताना देखील चेंगराचींगरी होऊन अनेक भाविकांचा मृत्यू झाला व कित्येक जखमी झाले. आखाडा परिसर, बडे हनुमान मंदिर, परेड ग्राउंड, व्हीआयपी घाट, अरैल, झुसी आणि सालोरी यासारख्या संवेदनशील ठिकाणी विशेष वॉच टॉवर बांधण्यात आले आहेत. येथे तैनात असलेले सैनिक आधुनिक शस्त्रे आणि उपकरणांनी सुसज्ज आहे कुंभमेळ्याची सुरक्षा व्यवस्था अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. २,७५० एआय आधारित सीसीटीव्ही कॅमेरे आणि ८० व्हीएमडी स्क्रीन मेळ्यातील प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवत आहेत.३ जल पोलिस स्टेशन आणि १८ जल पोलिस नियंत्रण कक्ष तैनात आहेत.५० अग्निशमन केंद्रे आणि २० अग्निशमन चौक्या बांधण्यात आल्या आहेत.कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी ४,३०० अग्निशमन यंत्रणा सज्ज आहेत. प्रयाग राज कुंभ मेळ्यात कडी सुरक्षा व्यवस्था होती. पण भिड लाखोंच्या घरात असल्याने सुरक्षा व्यवस्था कमी पडली. धर्माचा लोकांवर मोठा पगडा असतो. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी गर्दी मोठ्या प्रमाणावर होणारच. म्हणून सद्य स्थितीत जी सुरक्षा व्यवस्था व गर्दी व्यवस्थापन तंत्र अधिक विकसित करण्याची गरज आहे. महा कुंभमेळ्यात ज्या पद्धतीने भक्तांचा मृत्यू झाला त्यामुळे संपूर्ण देश हळहळव्यक्त करत आहे. या घटनेबाबत विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मात्र अशा घटनेवर राजकारण होता कामा नये. कारण हा राजकीय वक्तृत्वाचा मुद्दा नाही. हा राजकीय संवेदनशीलता, व्यवस्था आणि दूरदृष्टीचा मुद्दा आहे. याकडे राजकारण्यांचे आणि स्थानिक पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. अशा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी एकत्रितपणे विचार करण्याची गरज आहे. कारण गर्दी नियंत्रण करणारी यंत्रणा नसल्यामुळे अशी घटना कुठेही घडू शकते. त्यामुळे या घटनेची कारणे शोधून भविष्यात असे घडू नये यासाठी विचार होणे गरजेचे आहे. जिथे जिथे एवढी गर्दी जमते तिथे पोलिस प्रशासनाची वृत्ती अतिशय लवचिक असते. काही व्हीआयपी अशा गर्दीच्या ठिकाणी येतात तेव्हाच पोलिस प्रशासन कार्यक्षम दिसते. अर्थात महाकुंभ घटनेची पूर्णतः जबाबदारी आयोजकांची आहे. महा कुंभ मेळ्यात ४०-४५ कोटी भक्त येणार हे गृहीत असताना त्या तुलनेने सुरक्षा व्यवस्था तोकडीच होती.. ही बाब तेथे उपस्थित भाविकांनी मुलाखती दरम्यान सांगितले. कोटीच्या घरात गर्दी घटनास्थळी जमणार याचा अंदाज आयोजकांना होता. परंतु त्यासाठी पोलिसांचा बंदोबस्त कमीच होता. तसेच रुग्णवाहिका किंवा डॉक्टरांची नियुक्ती अभाव देखील होता. धार्मिक स्थळावर सुरक्षा व्यवस्था व गळती व्यवस्थापनाची पद्धत कशी उत्तम असते याचे उत्तम उदाहरण शेगाव येथील गजानन महाराज मंदिराचे देता येईल. दुसरे उदाहरण शिर्डीचे देता येईल.या ठिकाणी कधीच अनुचित प्रकार घडला नाही..याचा बोध धार्मिक आयोजकांनी, प्रशासनाने घ्यायला पाहिजे. वास्तविक भूतकाळात घडलेल्या अशा दुर्घटनांमधून आपण काही धडा घेत नाही हे वास्तव आहे. अलीकडच्या काळात गर्दीच्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये चेंगराचेंगरीत लोकांचा मृत्यू होण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. गर्दीत होणारे अपघात कसे रोखणार, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.आता यावर पुनर्विचार करण्याची गरज आहे .

## लक्षवेधी छायाचित्र....



या चिमण्यांनो परत फिरा रे........


(छाया – संजय दारमवार, मुंबई )

# तुळशीपुढील दिव्याच्या संस्कारासोबत बल्बचा शोधकर्ता कोण हेही शिकवा-अरविंद जगताप

ज्योतिर्मय साहित्य

**परळी** – स्व. श्यामरावजी देशमुख स्मृति समारोहात मुंबई येथील प्रसिद्ध चित्रपट पटकथा लेखक व चित्रपट गीतलेखक सुप्रसिद्ध व्याख्याते अरविंद जगताप यांचे व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अनिलरावजी देशमुख यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. समारोपसत्रातील या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संजय देशमुख तर प्रमुख उपस्थिती म्हणून सचिव रवींद्र देशमुख व प्रा प्रसाद देशमुख संस्थेच्या संचालिका सौ. छायाताई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्याताई देशपांडे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख सर यांनी प्रभू वैद्यनाथाच्या सानिध्यामुळे अध्यात्मिकदृष्ट्या परळीला एक वेगळं असं महत्त्व आहे, पण वेगवेगळ्या साहित्यिकांच्या कलाकारांच्या येण्यामुळे व अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परळीचं सांस्कृतिक आणि कलात्मकदृष्ट्या असलेले हे वैभव पुनश्च परळीला प्राप्त होईल अशी आमच्या सर्वांची येथे नक्कीच खात्री झालेली आहे. असे सांगून कलाकार हा जितका मोठा



असतो तितका तो नम्र – तितका विवेकशील आणि तितकाच प्रतिभा संपन्न असतो. असे आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

यानंतर परळीतील सांगीतिक क्षेत्रात मोठे योगदान असलेले श्री चंद्रकांत कळसे गुरुजी यांच्या अध्यात्म आणि संगीत पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला .

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण अरविंद जगताप यांनी आपल्या सहज सुलभ सुबोध ओघवत्या पण सौम्य विनोदी शैलीत जीवनांतील छोट्या छोट्या पण डोंगराएवढे महत्व असलेल्या अनेक विचारांची मांडणी केली. १९६८ मध्ये मराठवाड्यातील पहिली इंग्रजी शाळा परळी येथे श्यामरावजी देशमुख (काकांनी) लिटल फ्लॉवर नावाने स्थापन केली ही फार महत्त्वाची गोष्ट आहे असे ते म्हणाले. शिक्षणात सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असतो की, विद्यार्थी व शिक्षक यांचा त्याग. आणि त्यातून अशा संस्था उभ्या राहत असतात. यशस्वी माणसांनी गुणवंत माणसं निवडली पाहिजेत तर ती यशोगाथा मोठी होते. पण जर तुम्ही भलतीच माणसं निवडत गेला तर त्याची वाताहात व्हायला वेळ लागत नाही .

आपला स्मार्टफोन हा सतत स्मार्ट होत आहे; पण त्याच्याबरोबर आपण मूर्ख होत चाललोय . राजकीय क्षेत्रात होणाऱ्या भ्रष्टाचारा बाबत बोलतांना ते म्हणाले की, बालपणी ५० पैशाचा हिशोब घेणाऱ्या आईबापांनी भविष्यात फक्त वार्डमेंबर बनलेल्या मुलाने मिळविलेल्या कोट्यवधी रुपयाविषयी जाब विचारला तर भ्रष्टाचार कमी व्हायला मदतच होईल असे ते म्हणाले. तुळशीच्या पुढे दिवा लावताना जर प्रार्थना पाठ असेल तर त्या सोबतच बल्बचा शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञाचं नाव पण पाठ असलं पाहिजे तर अध्यात्माचा हात धरून विज्ञानाचा विकास होईल असे ते म्हणाले.

या त्यांच्या व्याख्यानामुळे परळीकर श्रोते मंत्रमुग्ध झाले. यानंतर सिद्धेश्वर इंगोले यांनी स्व. श्यामरावजी देशमुख यांच्या रांगोळीतून साकारलेल्या चित्रा करिता त्यांचा सत्कार करण्यात आला. तर महाविद्यालयातील कु. श्रुती हाले हिने रांगोळीतून साकारलेल्या पाच कवींच्या प्रतिकृती बद्दल तिचाही सत्कार करण्यात आला. यानंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेचे व इतर स्पर्धांचे बक्षीस वितरण पार पडले.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या संचालक मंडळापैकी सौ. विद्याताई देशमुख, सौ स्नेहाताई देशमुख तसेच परळी मधील अनेक मान्यवर व पत्रकार उपस्थित होते. या व्याख्यान सत्रानंतर स्पर्धेतील पारितोषिक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला . या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. डॉ अरुण चव्हाण व प्रा डॉ. गुट्टे पी व्ही यांनी केले. तर प्रा. डॉ एस.व्ही. कचरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खूप प्रयत्न केले.

# फिरत्या चाकावरती देसी शब्दांना आकार, दिल्ली प्रवासादरम्यान रेल्वेच्या डब्यात साहित्य संमेलन

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – 'फिरत्या चाकावरती देसी मातीला आकार' हे गदिमा आणि सुधीर फडके यांच्या अलौकिक प्रतिभेचा आविष्कार असलेले गीत सर्वांच्या मुखामध्ये अजरामर आहे. त्याच धर्तीवर तब्बल सात दशकांनी दिल्लीमध्ये होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या प्रवासादरम्यान 'फिरत्या चाकावरती देसी शब्दांना आकार, तू साकार सारस्वताचा आविष्कार'ची प्रचिती येणार आहे ते रेल्वेच्या डब्यात होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या आयोजनामुळेच.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर प्रथमच देशाच्या राजधानीमध्ये २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. 'दिल्ली अब दूर नहीं' असे आपण म्हणत असलो तरी दिल्लीला पोहोचण्यासाठी खूप वेळ लागतो. ही बाब ध्यानात घेऊन संमेलनाच्या कार्यक्रमात इच्छा असूनही सर्वांना सामावून घेता येत नसल्याने साहित्यिकांसह दिल्लीला येणाऱ्या साहित्यप्रेमींना संधी देण्याच्या दृष्टीकोनातून फिरत्या चाकावरती साहित्य संमेलन आयोजनाची संकल्पना मूर्त रूपाला येत आहे, असे संमेलनाची आयोजक संस्था असलेल्या सरहद संस्थेचे संजय नहार यांनी सांगितले.

साहित्य संमेलन हा प्रत्येकाच्या आकर्षणाचा आणि आस्थेचा विषय आहे. संमेलनाच्या व्यासपीठावरून सादर होणाऱ्या चर्चासत्र, कथाकथन, परिसंवाद आणि कविसंमेलनात सहभाग मिळावा अशी साहित्यिकांची मनीषा असते. संमेलनाच्या कार्यक्रमांची चौकट ध्यानात घेता सर्वांनाच संधी देणे शक्य होत नाही. कविसंमेलन असो किंवा कवीकट्टा उपक्रमात तीन मिनिटांची कविता सादर करण्यासाठी कवींची धडपड असते. अशा काव्यप्रेमींना रेल्वेच्या डब्यामध्ये होणाऱ्या संमेलनात काव्य सादरीकरणाची संधी उपलब्ध होणार आहे. या मोठ्या पल्ल्याच्या प्रवासातील साहित्य संमेलनात चर्चासत्र, कथाकथन, काव्यगायन आणि परिसंवाद होणार असून त्यामध्ये सहभाग घेणारे साहित्यिक आणि साहित्यप्रेमींना स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र



आणि पुस्तकांची भेट देऊन गौरविण्यात येणार आहे. सरहद संस्थेचे युवा कार्यकर्ते वैभव वाघ यांच्याकडे या संमेलनाच्या समन्वयकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, असे नहार यांनी सांगितले. यापूर्वी घुमान येथे झालेल्या संमेलनापूर्वी रेल्वेच्या डब्यात संमेलन झाले होते. त्याची पुनरावृत्ती आता होत असून रेल्वेच्या प्रत्येक डब्यामध्ये स्वतंत्र संमेलन भरविण्यात येणार आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## पहिल्या बालसाहित्य संमेलनाचे वाजले सूप; १२०० चिमुकल्यांचा सहभाग, पुरस्कार वितरण सोहळा

ज्योतिर्मय साहित्य

**मंगरूळ चव्हाळा** – पारंपरिक साहित्य संमेलनाच्या तुलनेने सर्वार्थाने आगळेवेगळे ठरलेल्या प्रथम राज्यस्तरीय बालसाहित्य संमेलनाचा समारोप झाला. या साहित्य संमेलनात बालकवींनी तुफान गाजलेल्या अनेक कविता सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. मुलांमध्ये साहित्य कलेची आवड निर्माण करण्यात हे संमेलन यशस्वी झाल्याचे मनोगत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यरत मंगरूळ चव्हाळ येथील प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रमशाळेचे संस्थापक अध्यक्ष मतीन भोसले यांच्या पुढाकारातून पहिल्यांदाच अशा प्रकारच्या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. विविध जिल्ह्यांतून जवळपास १२०० वर चिमुकले या संमेलनात सहभागी झाले होते. सुपरिचित कवींनी बालसाहित्य संमेलनात रंग भरले.

अविस्मरणीय ठरलेल्या बालसाहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमात संमेलनाध्यक्ष अनंत राऊत यांनी एकापेक्षा एक सरस कवितांचे सादरीकरण करून संपूर्ण माहौल आनंदित केला. या संमेलनात कथाकथन, कविसंमेलन, गायन, नृत्याविष्कार, परिसंवाद या गटांमध्ये विजेते ठरलेल्या बालसाहित्यिकांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. बालसाहित्य संमेलनाच्या निमित्ताने प्रश्नचिन्ह आश्रमशाळेत एकत्रित आलेल्या चिमुकल्यांनी समारोपीय कार्यक्रमानंतर एकमेकांचा निरोप घेतला. यावेळी अनेकांचे डोळेसुद्धा पाणावले होते. बाहेरून आलेल्या विद्यार्थ्यांनी ४५८ मुलामुलींशी हितगूज करून जड अंतःकरणाने निरोप घेतला.

## जर्मनीतही पाली साहित्य प्रकाशित; पाली भाषेच्या संवर्धन आणि प्रचारासाठी प्रयत्न गरजेचे-डॉ.कुमार

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – 'पाली भाषेला प्रदीर्घ इतिहास लाभला असून, ती सर्वसामान्यांची भाषा होती. तथागत गौतम बुद्धांनीदेखील पाली भाषेतूनच धम्मोपदेश दिले आहेत. भारत, श्रीलंका आणि पूर्वेकडील देशात पाली भाषा मोठ्या प्रमाणात विखुरलेली आहे. या भाषेतील विपुल साहित्याचा अनुवाद होणे आवश्यक असून, पाली भाषेच्या संवर्धन आणि प्रचारासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहेत,' असे मत अखिल भारतीय पाली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि कोलकाता विद्यापीठाच्या पाली विभागाचे प्रमुख डॉ. उज्वल कुमार यांनी शनिवारी व्यक्त केले.



पद्मपाणि फाउंडेशन संचालित अभिजात पाली भाषा संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली आणि बौद्ध अध्ययन विभाग यांच्या वतीने आयोजित अखिल भारतीय पाली साहित्य संमेलनात डॉ. कुमार बोलत होते.भवानी पेठेतील सावित्रीबाई फुले सभागृहात झालेल्या या संमेलनाचे उद्घाटन जर्मनी येथील प्रसिद्ध भाषा तज्ज्ञ डॉ. जेम्स वू हार्टमन यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक सुनील वारे, पद्मपाणी फाउंडेशनचे राहुल डंबाळे, स्वागताध्यक्ष डॉ. सिद्धार्थ धेंडे, प्रतिमा प्रकाशनाचे डॉ. दीपक चांदणे, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे, लातूर येथील राजर्षी शाहू कॉलेजच्या पाली विभागाचे डॉ. भिमराव पाटील, सुवर्णा डंबाळे आदी उपस्थित होते. तसेच या संमेलनात भारतासह म्यानमार, श्रीलंका, व्हीएतनाम, जर्मनी, स्वित्झर्लंड, साऊथ कोरिया, थायलंड या आठ देशातील पाली भाषेतील अभ्यासक-संशोधक सहभागी झाले होते.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली आणि बौद्ध अध्ययन विभागाच्या डॉ. दीपाली पाटील यांनी प्रास्ताविक केले. दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले.

'पाली भाषेला धम्माचे अधिष्ठान प्राप्त असून, इथल्या राजकीय चळवळींचा तो कणा आहे. देशाच्या बहुसंख्य भागात पाली भाषेच्या खुणा आढळतात. केंद्र सरकारने मराठीसह पाली भाषेलाही अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे. मात्र, त्याचा उत्सव साजरा केला जात नाही,' अशी खंत गौतम चाबुकस्वार यांनी या संमेलनात व्यक्त केली.

'पाली भाषा ही अत्यंत प्राचीन भाषा आहे. या भाषेत मोलाचे ज्ञान उपलब्ध असून, अभिजात कला आणि साहित्याची निर्मिती पालीतून झाली आहे. या अमूल्य ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार जगभरात व्हायला हवा. पाली सोसायटी स्थापन करून जर्मनीतही पालीतील साहित्य प्रकाशित करण्यात येत आहे,' असे भाषातज्ज्ञ डॉ. हार्टमन यांनी सांगितले.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

### सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार


**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचं वेगळेपण अनुभवताना आणि त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणं आवश्यक असतं. खरं म्हणजे, आपली आणि आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपआपल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते. आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकंच सुंदर सजवायचं, खुलवायचं असतं. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारं मन मात्र मोठं असावं लागतं. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनानं सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण या सर्व बाबींवर आपलं बाहय तसेच अंतर्गत व्यक्तिमत्व कसं असू शकेल, हे ठरतं. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपलं व्यक्तिमत्व ऐट अणू शकतं. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारं मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकतं. त्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची नितांत गरज असते. नकारात्मकतेच प्रादुर्भाव होण्याची हीच तीन माध्यमे असतात, आपले विचार, वर्तन आणि व्यवहार. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असलो, तर आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. मानसिक स्वास्थ्यासाठी समस्या निर्माण करणारे नकारात्मक विचारांपासून आपण शक्य तितकं दूर राहणे पसंत करावं. सकारात्मक विचारांच्या माध्यमातून आपण निश्चितच चांगलं परिवर्तन घडवून आणू शकतो.

## तू गाये जा...

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)





पुढे त्या पुण्याला स्थायिक झाल्या. योगायोगाने त्यांची संत साहित्याचे अभ्यासक असलेले डॉ अरविंद नेरकर यांच्याशी भेट झाली. मग त्यांच्या दोघांच्या सहकार्यातून अनेक सुंदर कार्यक्रमांची निर्मिती झाली. त्यामध्ये मन हे राम रंगी रंगले, पांडुरंगी मन रंगले, दिंडी चालली चालली, अमृतवाणी ज्ञानियांची, रंग भक्तीचे यासारखे अनेक कार्यक्रम सादर झाले. या कार्यक्रमांना डॉ अरविंद नेरकर यांचे रसाळ निवेदन आणि चारुशीला यांचे



सुश्राव्य गायन असा सुरेख संगम असायचा. हे कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. २४ गायत्री मंत्रावर आधारित २४ गायत्री मंत्राचा लाभ सांगणारा स्वरगायत्री हा आगळावेगळा कार्यक्रमही त्यांनी सादर केला. त्यासोबतच स्वरांच्या हिंदोळ्यावर सप्तसूर रंगले, चांदणे शिंपीत जाशी, रागांचे रंग यासारखे अनेक सुगम संगीताचे अनेक कार्यक्रम त्यांनी डॉ नेरकरांसोबत सादर केले आहेत आणि ते रसिकांचे अतिशय आवडते आहेत. केवळ इथेच त्या थांबल्या नाहीत तर साहित्यातील शब्द आणि संगीतातील गांधार असा विचार डोळ्यासमोर ठेवून या दोघांनी शब्दगांधार या दिवाळी अंकाची निर्मिती केली आणि गेल्या पंधरा वर्षापासून दर्जेदार दिवाळी अंक वाचकांना हे दोघे सादर करीत आहेत.

संगीत क्षेत्रात जवळपास ५० वर्षानूनही अधिक काळ साधना, तपश्चर्या करणाऱ्या आणि आपले अमूल्य योगदान देणाऱ्या चारुशीला यांना आपले जीवन कृतार्थ झाल्याचा अनुभव या क्षणी येतो आहे. यापुढील आयुष्यात समाजातील उपेक्षित घटकांची जास्तीत जास्त सेवा करायची आणि त्यांच्यासाठी कार्यक्रम करायची असे त्यांनी ठरवले आहे. विविध पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला आहे. विजया फाउंडेशनच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार त्याचप्रमाणे मॉम इंडिया कंपनीतर्फे जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे इतरही अनेक प्रतिष्ठित पुरस्कार त्यांना लाभले आहेत. नुकताच स्वरगायत्री प्रतिष्ठान या संस्थेचा जीवनगौरव पुरस्कारही त्यांना जाहीर झाला आहे. या गानतपस्विनीला पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा !

**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

### परमार्थ स्तवन

**ज्योतिर्मय साहित्य**

समास नववा

परमार्थ हा खुपच अध्यात्मवादी शब्द आहे. समर्थ जेव्हां दासबोध लिहित असतील तेव्हा त्यांनी किती विचार पूर्वक ह्या शब्दाची फोड केली हे दिसुन येते.

१)परम--सर्वश्रेष्ठ

२)अर्थ--म्हणजे ज्ञेयवस्तु


परमार्थ या शब्दात श्री कालाचे ज्ञान. सामावले आहे. ते कसे हे सांगण्याचा अल्पसा प्रयत्न करते आहे.

ब्रम्ह, ब्रम्हज्ञान, ब्रम्हज्ञान साधना या तिन्ही साठी ऐकच शब्द समर्थ वापरतात. आत्मज्ञानी व सिध्द पुरूषांच्या मते, आत्मज्ञानी व सिध्दपुरूषाच्या विचाराने पाहिले तर ब्रम्ह किंवा आत्मा सर्वश्रेष्ठ आहे. ब्रम्हवस्तु प्राप्त करून घेणे हे माणसाचे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे ते ध्येय गाठण्यासाठी जी साधना करावी लागते त्याला ''परमार्थ'' असे म्हणतात.

परमार्थ म्हणजे ईश्वराचा शोध होय.परम म्हणजे अखेरचे अद्वितीय आणि अर्थ म्हणजे कारण,हेतु,मुळ असा अर्थ निघु शकतो. हे विश्व घटनामय आहे. अनंत घटनांचा सागर आहे. घटना अनुभवली की तिचे मुळ किंवा कारण तिचा हेतु शोधल्या वाचुन मानवी बुध्दीला चैन पडत नाही. आणि या शोध नजरेतुनच धर्म,तत्वज्ञान, विज्ञान जन्म घेतात.

विश्वाच्या आदिकंरणाला ईश्वर म्हणतात. परमार्थ म्हणजे ईश्वराचा शोध होय. परम म्हणजे ऊत्तम मुख्य अर्थ म्हणजे द्रव्य, संपत्ती किंवा फलप्राप्ती होय.

समर्थानी अर्थशास्त्राचा पण अभ्यास केला आहे. आणि आजच्या घडीला तो अभ्यास किती महत्वाचा आहे हे अर्थशास्त्राची विद्यार्थीनी म्हणून मला खुपच ऊपयुक्त वाटतो. मर्यादित साधने, अमर्यादित गरजा यांचा मेळ बसवणे म्हणजे अर्थशास्त्र होय. आणि हेच समर्थानी अध्यात्मिक विचाराने सांगितले आहे. ते म्हणतात भगवंताचे ज्ञान आत्मसात करून जीवनातील दु:ख नामशेष करणे हेच परमार्थाचे खरे स्वरूप आहे. परमार्थी व्यक्तीला प्रपंच खोटा वाटतो मायेचा **(क्रमशः)**



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## नाम घेण्याला काहीही आड येत नाही

**ज्योतिर्मय साहित्य**

आपण असे पाहू की नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे हे सुलभ. समजा एक यंत्र आहे त्यात पुष्कळ चक्रे आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यातले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते ग्रंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्रे एकदम फिरू लागून आपले काम निश्चितपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही. व्यवहारात आपण पाहतोच की एखादी गोष्ट समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून कोणत्याही तऱ्हेच्या शंकाकुशंका न घेता कशाही तऱ्हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चातापाची वेळ येणार नाही. जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात; आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, देवा मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो.

प्रल्हाद द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले ? तेच आपण मागावे, आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील पण त्या झाल्या तर पश्चाताप व्हावा. देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर. पश्चाताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंत:करणात समाधान ठेवावे.

१४. जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.






विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७




## कोणत्याही ऋतूची निंदा करु नये.

**ज्योतिर्मय साहित्य**

जसे आपण काही व्रत कथा वाचल्या की, त्यात प्रथम लिहिलेले असते उतू नको,मातू नको,घेतला वसा टाकू नको. त्याच प्रमाणे कोणती व्रते करावीत हे आपण बघत आहोत. ही व्रते जुनीच आहेत फक्त काळानुसार आपण त्यात थोडा बदल करुन अंमलात आणावे.

वसंत,ग्रीष्म,वर्षा,शरद,हेमंत,शिशिर अशा सहा ऋतूंनी आपले संवत्सर पूर्ण होते. आणि हे ऋतूचक्र अव्याहत चालू असते. त्या मुळेच संपूर्ण जीवसृष्टीला, माणसाला जगण्यासाठी आवश्यक गोष्टी मिळतात. कधी कधी काही ऋतूंचा त्रास होऊ शकतो. पण तो काही जणांनाच होतो. काहींना ऋतू बदलाचा पण त्रास होतो. या बदलाच्या काळात काहींना आरोग्याशी संबंधित समस्या येऊ शकतात. पण त्यात ऋतूंचा दोष नसतो. आपली प्रत्येकाची प्रकृती भिन्न असते. त्या नुसार आपल्याला त्रास होतात. पण आपण आहार,विहार,विश्रांती,यात ऋतू प्रमाणे बदल करुन कधी आवश्यक ती औषध योजना करुन हे त्रास,आजार नियंत्रित करु शकतो. परंतू या कोणत्याही ऋतूंची निंदा करणे योग्य नाही.

आपण निसर्गा कडे बघितले की निसर्ग प्रत्येक ऋतुशी कसे जमवून घेतो,पशुपक्षी कसे जमवून घेऊन राहतात हे समजते. आणि कोणत्याही परिस्थितीत आनंदी कसे रहायचे हे शिकवतात. एक माणूसच असा आहे की आनंद शोधण्या पेक्षा दु:ख शोधत रहातो. आपल्याला जर कोणी आठवणी विचारल्या किंवा लिहायला सांगितल्या तर आनंदी प्रसंग फार कमी समोर येतात. आणि अवघड,दु:खाचे प्रसंग जास्त आठवतात. ही सवय जर आपण बदलू शकलो तर आपण कायम आनंदात राहू शकतो. हेच ऋतूंच्या विषयी करायचे. प्रत्येक ऋतुतील आनंद शोधायचा. आयुर्वेदिक औषधे देणाऱ्यांना या ऋतूंचे खूप महत्व असते. आपली संस्कृती,आपले सण समारंभ बघितले तर त्यात निसर्गाचेच पूजन दिसते. आपल्या पूर्वजांनी सगळे सण व त्यातील आहार,पूजा,व्रते त्या त्या ऋतू नुसार ठरवलेली होती. ऋतू बदलतात म्हणून तर आपल्याला विविध फळे,फुले यांचा आस्वाद घेता येतो. आणि अनेक प्रकारची धान्ये, भाज्या मिळतात. हा सर्व विचार करून विविधता देणाऱ्या ऋतूंचा सन्मान करु या. आणि या ऋतूंची निंदा बंद करु या.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**शक्यो वारयितुं जलेन हुतभुक् छत्रेण सूर्यातपो**
**नागेन्द्रो निशताङ्कुशेन समदो दण्डेन गोगर्दभौ।**
**व्याधिर्भेषजसंग्रहैश्च विविधैर्मन्त्रप्रयोगैर्विषम्**
**सर्वस्यौषधमस्ति शास्त्रविहितं मूर्खस्य नास्त्यौषधम्।।**

अर्थ – अग्नीचे निवारण जलाने संभव आहे. सूर्याच्या उन्हाचे निवारण छत्रीने होऊ शकते. मदोन्मत्त हत्तीला तीक्ष्ण अंकुशांनी काबूत आणले जाऊ शकते. औषधी व मंत्रप्रयोगाने विषाचे निवारण करता येईल. असे शास्त्रविहित उपचार आहेत. परंतु मूर्खासाठी काहीच औषध नाही.

साधारणपणे दोन माणसांतील व्यवहार हा साम, दान, दंड आणि भेद या चार उपायांनी होत असतो, असे शास्त्रविहित आहे. पण मूर्ख मनुष्याचे बाबतीत प्रस्तुत चार उपायांनी व्यवहार संभवत नाही. उष्णता हा अग्नीचा तर शीतलता हा पाण्याचा स्वभाव आहे. त्यामुळे अग्नीचे निवारण जलाने करता येते. सूर्याच्या उन्हापासून रक्षण व्हावे म्हणून सावली आवश्यक असते. अशी सावली आपल्याला छत्रीद्वारे मिळू शकते. म्हणून उन्हापासून संरक्षण करण्यासाठी छत्री उपयुक्त ठरते. हत्ती मदोन्मत्त होतो, तेव्हा त्याला नियंत्रित करण्यासाठी तीक्ष्ण अंकुशाचा वापर करण्यात येतो. तर साप इ. चे विष उतरवण्यासाठी औषधादिंचा उपयोग करता येतो. किंबहुना तद् तद् प्रसंगानुरूप असेच करणे अपेक्षित असते. पण मूर्ख लोकांच्या बाबतीत असा कोणताच शास्त्रविहित उपाय श्रेयस्कर ठरत नाही. उपयुक्त ठरत नाही. थोडक्यात मूर्खासाठी शास्त्रविहित असे कोणतेच औषध नाही.

## ।। श्री स्वामी समर्थ ।।



**ज्योतिर्मय साहित्य**

स्वामी म्हणतात – एखादा व्यक्ती एखाद्या कल्पनेसाठी मरतो, परंतु ती कल्पना, त्याच्या मृत्यूनंतर, एक हजार जीवन ती देईल.

एखाद्याची सर्वात मोठी चूक म्हणजे त्याचे वास्तविक स्वरुप ओळखणे नाही, आणि केवळ आत्मज्ञान आत्मसात केल्याने ते सुधारले जाऊ शकते. ज्या दिवशी तुम्ही हसला नाहीत तो दिवस फुकट गेला असे समझा.



## आरोग्य संजीवनी

### आरोग्याचे 'पांढरे शत्रू'



आपण जेवण करतो ते पौष्टिक घटक आणि ऊर्जा मिळावी म्हणून; पण अनेकदा जिभेचे चोचले पुरवणारे पदार्थ खातो त्यांचा आरोग्याला किती फायदा होतो हे माहीत नसते. बहुतांश वेळा असे पदार्थ आरोग्यास अहितकारकच असतात. कारण, त्यात साखर, मीठ, मैदा यांच्यासारखे घटक असतात. साखर, मीठ, मैदा यांना आरोग्यासाठी 'पांढरे विष' असे पूर्वी म्हटले जायचे. हे पदार्थ कसे अपाय करतात ते जाणून घेऊया...

साखर, मीठ, मैदा, पांढरा तांदूळ आणि गायीचे पाश्चराईज्ड दूध हे पाचही पदार्थ पोषणाच्या दृष्टीने शून्य समजले जातात. त्यात पोषणमूल्य शून्य टक्के असतात. जीवनसत्त्व किंवा खनिजे यापैकी काहीही त्यातून मिळत नाही. वास्तविक, याच गोष्टी शरीराला आवश्यक असतात. अतिसेवन केल्याने हे पदार्थ आरोग्यासाठी हानिकारकच ठरतात. या पाचही घटकांचा रंग पांढरा असल्याने याला 'पांढरे विष' म्हटले जाते. साखरेला तर अन्नविरहित अन्न असे म्हटले जाते. कारण, त्यातून पोषक घटक काहीच मिळत नाहीत. त्यात जीवनसत्त्वे, खनिजेदेखील नसतात. साखरेचे अतिप्रमाणात सेवन केल्यास स्थूलता आणि मधुमेह यांचा धोका वाढतो. त्यामुळे भविष्यात हृदयविकाराचा झटका, कर्करोग, ब्रेनस्ट्रोकसारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते.

**पांढरी साखर हानिकारक कशी ? :**


पांढर्या साखरेला रिफाईड साखरही म्हटले जाते. ती शुद्ध करण्यासाठी सल्फर डायऑक्साईड, फॉस्फोरिक ॲसिड, कॅल्शियम हायड्रॉक्साईड आणि ॲक्टिव्हेटेड कार्बनचा वापर केला जातो. रिफायनिंग केल्यानंतर साखरेतील जीवनसत्त्व, खनिजे, प्रथिने, एन्झाईम्स आणि इतर फायदेशीर पोषक घटक नष्ट होतात. त्यात केवळ सुक्रोज शिल्लक राहते आणि सुक्रोजचे अतिप्रमाण शरीरासाठी घातकच असते.


संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

**आरोग्याच्या समस्या :** साखरेच्या अतिसेवनामुळे चयापचयाशी निगडित आजार जसे कोलेस्टेरॉलचे वाढते प्रमाण, इन्सुलिन रेझिस्टन्स आणि उच्च रक्तदाब होतो. साखरेच्या अतिसेवनाने पोटावर चरबीचे थर जमा होतात. त्यामुळे स्थूलता, दात किडणे, मधुमेह आणि चयापचय क्रिया खराब होण्याच्या समस्या निर्माण होतात. त्याचे अतिसेवन केल्यास शरीरातील कॅल्शियमचे पचन किवा चयापचय गडबडते. साखर, हाडे, रक्त आणि दात यांच्यातून कॅल्शियम शोषून घेतात. जास्त प्रमाणातील साखर पचनसंस्थेवर परिणाम करते. शरीरात 'बी' जीवनसत्त्वाची कमतरता होते आणि मज्जासंस्थेवरही त्याचा प्रतिकूल परिणाम झालेला दिसतो. रिफाईड साखरेमुळे मेंदूमध्ये काही रासायनिक प्रक्रिया होतात, त्यामुळे सेरेटोनिन रसायनांचा स्राव वाहतो; आपल्याला हुशारी आल्यासारखे वाटते; पण काही वेळाने पुन्हा व्यक्तीला थकवा येतो, चिडचिड होते आणि नैराश्यही येते.

**पर्याय कोणते ? :** मधुमेहाने ग्रस्त लोकांनी तर साखरेचे सेवन न करता नैसर्गिक गोड पदार्थांचे म्हणजे फळांचे सेवन करावे. त्याशिवाय आरोग्य चांगले राखण्यासाठी साखरेऐवजी, गूळ, मध, खजूर, फळे, फळांचा रस आदींचे सेवन करावे. मध हा साखरेसाठी उत्तम पर्याय आहे. त्यात फ्रुक्टोज किंवा ग्लुकोज असले तर अनेक खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. **(क्रमशः)**

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आणि निरपेक्ष व्यक्तिमत्वाचा त्यांचा प्रभाव पडला. दरोडेखोरांचा म्होरक्या त्यांना शरण आला. सत्संगतीचा प्रभाव असा विलक्षण असतो. हळूहळू त्या दरोडेखारोनी आपला परंपरागत वाटमारीचा व्यवसाय सोडून दिला आणि ते कष्टाची कामे करून आपली उपजीविका करू लागले.

मग देवेंद्रनाथ आपल्यासोबत हळूहळू धाकट्या रवीला म्हणजेच रवींद्रनाथांना सोबत त्या ठिकाणी घेऊन येऊ लागले. रवींद्रनाथ त्या ठिकाणी प्रथम आले तेव्हा ते १०-१२ वर्षांचे असावेत. रवींद्रनाथांच्या विलक्षण प्रतिभेची चमक लहानपणापासूनच दिसू लागली होती. वयाच्या आठव्या वर्षापासूनच त्यांनी कविता करायला सुरुवात केली होती. आता शांतिनिकेतन या निसर्गरम्य ठिकाणी आपल्या वडिलांच्या सान्निध्यात त्यांचे अनौपचारिक शिक्षण सुरु झाले.

# सेवा आरोग्य फाऊंडेशन तर्फे एकत्रित सूर्यनमस्कार यज्ञ संपन्न

## सेवा वस्तीतील ७४० मुला-मुलांनी २४७४० सूर्यनमस्कार घातले

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


सेवा आरोग्य फाऊंडेशनच्या वतीने रथसप्तमी निमित्त सूर्यनमस्कार यज्ञ कार्यक्रम उत्साहात पार पडला.कोथरूड येथील जीत मैदानावर सकाळी ८ ते १० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात विविध सेवा वस्त्यांतील विद्यार्थी,पालक,स्थानिक नागरिक तसेच विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे महापारेषणचे अधिक्षक अभियंता संदीप हाके आणि सेवा आरोग्य फाऊंडेशन संस्थेचे संचालक मनोज देशमुख,डॉ सतीश जोशी, डॉ हर्षदा पाध्ये यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि भारत माता प्रतिमा पूजन करून झाली.त्यानंतर सामूहिक प्रार्थनेने सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. विशेष म्हणजे वस्तीतील ७४० जणांनी मिळून २४,७४० सूर्यनमस्कार घालून



आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ नारायण देसाई,संस्थापक सदस्य आणि कार्यकारी संचालक, सोसायटी फॉर इकोलॉजिकल रिस्टोरेशन - इंडिया,कार्यकारी परिषद सदस्य मेन्सा इंडिया गिफ्टेड चाईल्ड प्रोग्राम यांनी सूर्यनमस्काराचे तंत्र,फायदे आणि त्याचे जीवनातील महत्त्व यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.उपस्थितांनी नियमित सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प यावेळी केला. काही उत्कृष्ट सादरीकरण केलेल्या सहभागींना प्रातिनिधिक स्वरूपात पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सेवा आरोग्य फाऊंडेशनचे संचालक मनोज देशमुख,डॉ हर्षदा पाध्ये,डॉ सतीश जोशी उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ सतीश जोशी यांनी सेवा आरोग्य फाऊंडेशनतर्फे घेत असलेल्या विविध आरोग्य तसेच संस्कार प्रकल्पांची माहिती दिली.प्रीती पाटकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी यशवंत ववले,दत्ताजी वाळवेकर,दिलीप लिमये,विवेक बाकरे,प्रीती पाटकर,वैशाली चव्हाण,निरंजनी शिरसट,मानसी जाधव आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला संस्थेचे कर्मचारी,कार्यकर्ते,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक तसेच विविध शाळांचे शिक्षक उपस्थित होते. समृध्दी वर्ग प्रकल्प समन्वयक निरंजनी शिरसठ यांनी सेवा आरोग्य टीम च्या सहाय्याने कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.सर्व मुला मुलींना प्रमाणपत्र देण्यात आली.खाऊ वाटप करण्यात आला.




# वाचक मन घडविणारी एक संस्कार संहिता - कस्तुरीगंध

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**(मागील अंकावरून)**

ही परिस्थितीने कशी बदलत जातात हाच या कथेचा एक महत्वाचा संदेश आहे. कथेतून आईची माया उन्मळून पडल्याचे दुःख आणि माहेराची शिदोरी उध्वस्त झाल्याची वेदना कथन करण्यात लेखक यशस्वी झालेले आहेत. लोक शिक्षक ही संकल्पनाच लेखकाने या कथासंग्रहात नव्याने मांडलेली आहे. शिक्षकांची भूमिका फक्त आणि फक्त शिक्षण देणे एव्हढीच नसून सुसंस्कारीत आणि सक्षम पीढी घडविणे हे देखील शिक्षकाचे कर्तव्य आहे. अभ्यासक्रमातील द्वाच्यानुसार शिकवणे किंवा शिक्षण देणे एवढेच शिक्षक किंवा गुरु या संकल्पनेत अपेक्षित नसून समाज प्रबोधन, अंधश्रध्दा निमुर्लन, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन या बाबींसह एक चांगला नागरिक घडवणं ३ बाबत जनजागृती करणंही अंतर्भूत आहे, अशी व्याख्याचं लेखकाने रुढ केलेली आहे. खुशालराब आणि जानराव यांच्या माध्यमातून त्यांनी प्रातिनिधिक शिक्षक उमे केले आहेत. जानरावांच्या मनात शंकेची पाल घालून पाटलाच्या माध्यमाने केलेली कानऊघडणी सोनाराच्या हाताने कान टोचणी केल्यासारखी आहे. माठ पाण्याने भरुन राहण्यात त्याची धन्यता नाही तर त्यातलं पाणी पिवून तहानलेलयाची तहान भागली तरच त्या माठाला अर्थ आहे असं सांगतांना लेखकाने ताकाला जातांना लोटा लपवलेला नाही. ही लेखकाचं पारदर्शी शैली असल्याचं मी ठामपणे नमूद करतो. यामुळेच ही कथा बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एफ. वाय. बी. ए. च्या अभ्यासक्रमाला लागली

आहे. संग्रहातील कथांचा एकुण विषय कौटुंबिक जिव्हाळा, नात्यातील ओलावा, समाजभान, शिक्षणाची गरज, नितीमुल्यांची आवश्यकता, सस्कारांचे संवर्धन आणि व्यसनमुक्त समाज यासाठी आवर्जुन लिहीलेल्या या कथा साधारणपणे लघुत्तम असल्या तरी त्यातिल आशय आणि विषय या दृष्टीने त्या एकूणच संस्कार संदेशाचा सागर आहेत. अत्यंत कमी पात्रात, कमी घटनाक्रमामध्ये कथा विकसीत करुन पात्रांचे संवाद आणि निवेदनाव्दारे लेखकाने केलेली कथेची मांडणी सुलभ आहे. त्या वाचकाच्या मनावर पकड घेतात. बऱ्याच कथामध्ये फ्लॅश बैंक तंत्र अर्शतः वापरण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे तसेच कथेच्या शेवटी एक म्हण किवा एका विचाराशी कथेचे सुत्र जोडले आहे. यामुळे कथेला एक सुवर्ण किनार प्राप्त होते. मत्सरासायटीस ही विनोदी कथा या कथासंग्रहात थोडी उपरी बाटली, असं असलं तरी, कथांची वातावरण निर्मिती आणि संवादातून जाणवलेले पात्रांचे स्वभावदर्शन मनाची पकड़ घेणारे आणि अप्रतिम आहे. यातून लेखकाची सुक्ष्म निरीक्षण क्षमता अधोरेखीत होते.



**पुस्तक परीक्षण**

ॲड. विलास मोरे
७५८८००७८६६

प्रा. बी.एन. चौधरी यांनी या कथा ओढून ताणून लिहिलेल्या नाहीत, काल्पनिकतेचा आधार घेवून कथेचा गभा निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला नाही. तो त्यांनी आपल्या आजूबाजूच्या बाताबरणातून शोधला आहे. यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत. कथेत केवळ काल्पनिकता नाही तर सभोवतालच्या वास्तवाचे नेमके भान आहे. हेच या कथासंग्रहाचे खास वैशिष्टय आहे. लेखक हे शिक्षक, पत्रकार, कवी, समिक्षक आणि व्यंगचित्रकार असल्याने सामाजाचे रंग, ढंग आणि व्यंग त्यांच्या लेखणीतून अचूक उतरले आहेत. त्यांच्या या कथासंग्रहाला मोठे आकाश खुले आहे. पुढील वाटचालीसाठी मित्र या नात्याने मी त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो.

कथा संग्रह कस्तुरीगंध लेखक, प्रकाशक
प्रा. बी.एन. चौधरी
चपराक, पुणे
पृष्ठ २०८ मूल्य-३५०/-रु.



भारतीय जैन संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी पुणे येथील अधिवेशनात बिनविरोध निवड झालेले मराठवाड्यातील सुप्रसिद्ध सीए व कॅनरा बँकेचे माजी संचालक सुनीलजी कोचेटा ( लातूर ) यांचे माध्यम सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक विचारपीठाच्या वतीने अभिनंदन करताना अध्यक्ष जयप्रकाश दगडे, डॉ. हंसराज बाहेती, कोषाध्यक्ष ईश्वरचंद्र बाहेती.

# लातूरच्या सीमाभागात ४ थे मराठी साहित्य संमेलन सुरु

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**लातूर** - ग्रामीण भागातील वाचन संस्कृतीला नवचालना मिळावी यासाठी लातूर जिल्ह्यातील सीमावरती भागात ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. शहरी भागातील वाचन संस्कृती दिवसेंदिवस संपुष्टात येत आहे मात्र अजूनही ग्रामीण भागात वाचक आहेत त्यामुळे यांना चालना मिळावी आणि मराठी भाषा ही घराघरात पुन्हा नव्याने पोहोचावी यासाठी असे साहित्य संमेलन व्हावे असे डॉक्टर मंजुषा कुलकर्णी म्हणाल्या. ग्रामीण भागातील नवसाहित्यिकांना व्यासपीठ मिळावे आणि ग्रामीण भागात वाचनसंस्कृती जोपासली जावी, या उद्देशाने लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ येथे दोनदिवसीय चौथ्या मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.




साहित्य आणि संस्कृती संवर्धन मंडळ, मराठवाडा साहित्य परिषद यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

# नाट्यवाचन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दिमाखात साजरा



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पर्वती** - मातृभाषा अध्यापक संस्था पुणे व रोटरी क्लब पुणे पर्वती यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या महिन्यात नाट्यवाचन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. अनेक शाळांनी यात अगदी उत्स्फूर्त सहभाग दाखवला होता. या स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला. ज्ञानप्रबोधिनी शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. त्याचे सादरीकरणही झाले. लहान गट, मोठा गट, वाचिक अभिनय, वैयक्तिक, शिक्षक नाट्य संहिता लेखन, सांघिक असे सन्मान करण्यात आले. मातृभाषा अध्यापक संस्था, पुणे या संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्मिता ओव्हाळ यांनी प्रास्ताविक केले. संस्थेतील पदाधिकारी मा.संध्या माने, सौ.वंदना आणेकर निमल गीताभारती, निफाडकर मंगल, मा.पढेर विकास, सौ.शामला पंडित (दीक्षित), मा.श्रीम. सुरेखा लेंभे, मा.श्रीम.सोनवणे सुरेखा, मा.श्री.जगताप सुजित, मा.श्री.गायके संभाजी, पिंगळे संजय, सुरळकर सुलभा, शारदा पानगे यांचे कार्यक्रम सुनियोजित पार पाडण्यासाठी सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रफुल्ल मुक्कामावर यांनी सिंगापूर या देशात मराठी शिकवण्याचे अनुभव सांगितले. शालेय वयापासूनच आपल्यातील कौशल्य ओळखून स्वतःचा व्यक्तीमत्व विकास साधावा. प्रमुख पाहुणे मयुरा डोळस यांनी अभिनय क्षेत्रात नेमकं काय करावं यासाठी मार्गदर्शन केले, संभाजी गायके यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. लेखक आणि कवी प्रफुल्ल मुक्कावार त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. मयुरा डोळस या उद्योजिका, लेखिका, दिग्दर्शिका यांचे मार्गदर्शन लाभले नवीन काही तरी शिकत राहिले पाहिजे ही आजच्या काळाची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा या काळात अनेक कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे. डी इकॉनॉमी समजून घ्या, त्याचा भाग बना. एकाच आयुष्यात खूप गोष्टी करायच्या आहेत, स्वतःच्या आवडी ओळखा असे मार्गदर्शनात त्यांनी सांगितले, सुरेखा लेंभे यांनी सूत्रसंचालन केले कार्यक्रमाचे आभार संजय पिंगळे यांनी मानले.

# श्रीयश फार्मसी मध्ये हिमोग्लोबिन तपासणी शिबिर



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** - ीयश इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एजुकेशन अँड रिसर्च मध्ये दि. ३ १ जानेवारी रोजी हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या मध्ये लायंस ब्लड सेन्टरच्या श्यामराव सोनवणे व डॉ. उज्वल नदे यांच्या मार्गदर्शनाखाली १०० पेक्षा अधिक विद्यार्थीनीनी या शिबिराचा लाभ घेतला. महाविद्यालयातील डॉ. मंगेश घोडके, प्रा. गिरिश पाटील व प्रा. माधुरी खांडगावकर यांनी सहकार्य केले श्रीयश प्रतिष्ठान अश्या विविध उपक्रमाद्वारे नेहमी समाजाच्या आरोग्य विषयक गरजांकडे लक्ष देत असते. व असे उपक्रम वेळोवेळी राबवत असते.

या प्रसंगी श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे, सहसचिव अद्वैत मंगरुळे, विश्वस्त ऐश्वर्या मंगरूळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल व संस्थचे सर्व पदाधिकारी, श्रीयश फार्मसी चे प्राचार्य डॉ. गणेश तापडिया, यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उपक्रमाचे अभिनंदन केले.



# गाइदिन्ल्यू ही नागाओंकी रानी है ।

ज्योतिर्मय साहित्य

ईशान्य भारतातील निसर्गरम्य सौंदर्याने नटलेल्या सात राज्यांपैकी मणिपूर राज्यात उहुसैन व मकरू या नद्यांमध्ये काला नागा पर्वतांची रांग आहे. या रांगांमध्ये रोंगमै नागा नावाची जनजाती राहते. तेथील लुकाऊ गावामध्ये २६ जानेवारी १९१५ रोजी प्रसिद्ध भारतीय स्त्री स्वातंत्र्यसेनानी लोथोनांग पात्रेई आणि क्चाक्लेनिउ या दांपत्यापोटी गाइडिन्ल्यू यांचा जन्म झाला. एकूण आठ भावंडांत पाचवी असलेली गाइडिन्ल्यू लहानपणापासूनच अतिशय धाडसी होती. या भागात शाळा नसल्यामुळे त्यांचे शिक्षण होऊ शकले नाही. ब्रिटीश अधिसत्तेच्या या कालखंडात भारतभर स्वातंत्र्यासाठी तसेच अन्यायाविरुद्ध इंग्रजी सत्तेविरुद्ध लढे सुरू होते. गाइडनल्यू लहानपणापासूनच इंग्रज शासनाचे अत्याचार, आपल्या संस्कृतीवर, धर्मावर होणारे ख्रिस्त्यांचं आक्रमण पहात होत्या. त्यांना समज आल्यापासून त्या स्वतंत्र विचाराच्या, दृढ इच्छाशक्ती असलेल्या, प्रतिभासंपन्न, चिंतनशील, तीक्ष्ण बुध्दीच्या होत्या.त्यांचा चुलतभाऊ हैपोऊ जादोनांग याने हेरका हे धार्मिक आंदोलन सुरू केले आणि ब्रिटीश सरकारविरोधात जनआंदोलन केले. विशेषतः नागा लोकांच्या ख्रिश्चनीकरणास त्यांनी लोकचळवळ उभी करीत विरोध चालू केला. हळूहळू हे आंदोलन सशस्त्र बनले. वयाच्या १३ व्या वर्षी गाइदिन्ल्यू या आंदोलनात सहभागी झाल्या. मणिपूर-नागालँड मधून ब्रिटीशांना बाहेर हाकलून प्राचीन नागा संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे या उद्देशाने जादोनांग आणि त्यांचे सर्व सहकारी कार्य करीत होते. इंग्रज शासनाने जादोनांग यांना पकडून २९ ऑगस्ट १९३१ रोजी फाशी दिली. त्यांच्या मृत्यूनंतर आंदोलनाची सूत्र अवघ्या १६ वर्षाच्या गाइदिन्ल्यू कडे आली. लहान वयातच त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा द्यायला सुरवात केली. हम आजाद लोग है। गोरे हमपर राज नहीं कर सकते। अशी घोषणाच त्यांनी दिली. स्थानिक लोकांना आंदोलनात ओढण्यासाठी त्यांनी इंग्रजांना टॅक्स देऊ नका असं सांगितले. आपल्या संस्कृतीचं रक्षण करणं, रूढी, परंपरा टिकवून ठेवणं, अंधश्रध्दा दूर करणं, तसंच ब्रिटिशांना आपल्या देशातून हाकलून लावणं हे ध्येय त्यांनी उराशी बाळगलं होतं. देशामध्ये गांधी-नेहरू-पटेल यांचे व इतर नेत्यांच्या इंग्रजाविरुद्धच्या आंदोलनाचा मोठा उद्रेक त्यावेळी चालू होता. इंग्रज शासनाने लोकांवर कारवाई सुरू केली. गनिमी काव्यात, शस्त्र चालविण्यात तरबेज असलेल्या गाइदिन्ल्यू बरोबर सुमारे चार हजार क्रांतीकारी लोकांचे संघटन होते. त्यांचा चुलतभाऊ जादोनांगला फाशी दिल्यानंतर नागा लोकात पसरलेल्या असंतोषाला त्यांनी संघटीतरित्या इंग्रज सरकारविरुद्ध चळवळीचे स्वरूप देण्यात यश मिळविले होते. त्यांनी नागा जमातीतील सर्व गटांना एकत्र आणून इंग्रज शासनाविरुद्ध मोठे सशस्त्र आंदोलन चालविले. अत्यंत गुप्तपणे त्यांच्या इंग्रज शासनाविरुद्ध कारवाया चालत, त्यामुळे त्यांना पकडण्याचे बरेच प्रयत्न चालू होते. गाइदिन्ल्यू भूमिगत राहून इंग्रंजावर हल्ला करीत राहिल्या. त्यांच्या या गनिमी काव्याच्या लढाईने इंग्रज शासन जेरीस आले. गाइदिन्ल्यू आणि तिच्या सहका-यांनी १६ मार्च १९३२ रोजी आसाम रायफल्स च्या हंग्रुम गावातील फौजेच्या संरक्षणासाठी लावलेल्या दुस-या ठाण्यावर केवळ भाल्यांच्या सहाय्याने हल्ला केला. ही लढाई इतिहासामध्ये हैग्रम की लढाई'' म्हणून प्रसिद्ध आहे. आसाम प्रांताच्या गव्हर्नरने आसाम रायफल्सच्या दोन तुकड्या गाइदिन्ल्यू यांच्या मागावर पाठविल्या. त्यांना पकडून देणाऱ्यास त्याकाळातील ५००/- रुपयांचे बक्षीस जाहीर केले. जे गावकरी त्यांच्या विरोधात मदत करतील, त्यांना दहा वर्षे करमाफीही जाहीर करण्यात आली. गारदिन्ल्यू यांना मदत करणाऱ्या दोन गावांत इंग्रज शासनाने जाळपोळ केली. तरीही नागा लोक त्यांना आर्थिक व मनुष्यबळाची मदत करतच राहिले. गाइदिन्ल्यू यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच गेली. १९३२ साली गाइदिनाल्यू यांनी त्यांच्या क्रांतीकारी साथीदारांना आश्रय घेता येईल असा मोठा लाकडी किल्ला पुलोमी गावात बांधायला सुरवात केली. हे बांधकाम सुरु असतानाच कॅप्टन मॅक्डोनाल्डच्या **(क्रमशः)**




शिरीष चिटणीस

# चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचा धमाल टिझर भेटीला



ज्योतिर्मय साहित्य

रियुनियन म्हणजे धमाल मस्ती. अशाच जबरदस्त बॅकबेंचर्स मित्रांच्या रियुनियनचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात 'इकडे आड तिकडे विहीर', आगीतून फुफाट्यात', धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय', 'बुडत्याचा पाय खोलात', 'दुष्काळात तेरावा महिना' या म्हणींतून या बॅकबेंचर्सची मजेशीर ओळख ही करून देण्यात आली आहे. या म्हणींची भानगड आणि त्यामागची गंमत हे सगळं जाणून घ्यायचं असेल तर २८ फेब्रुवारीला चित्रपटगृहात येणारा चिकी चिकी बुबूम बुम' हा चित्रपट तुम्हाला पहावा लागेल.

शीर्षकापासून आपलं वेगळंपण अधोरेखित करणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' या चित्रपटाचं काही दिवसांपूर्वीच एक मजेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. या पोस्टरवरून चित्रपटाविषयी उत्सुकता अधिकच वाढली होती. त्यातच आता चित्रपटाचा धमाल टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या टिझरमध्ये दिसणारा पार्टीतला गोंधळ आणि सोबत स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्राजक्ता माळी, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, प्रभाकर मोरे अशा कलाकारांची जमून आलेली उत्तम भट्टी काहीतरी धमाल घडवणार हे दाखवतोय. यासोबतच नम्रता संभेराव, वनिता खरात, सचिन गोस्वामी, ओंकार राऊत, प्रियदर्शनी इंदलकर, अभिजीत चव्हाण, निखिल रत्नपारखी, चेतना भट, निखिल बने, श्याम राजपूत, श्लोक खांडेकर, प्रमोद बनसोडे, ऐश्वर्या बडदे हे कलाकारही चित्रपटात धमाल आणणार आहेत.

नारकर फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित, आयडियाज द एंटरटेनमेंट कंपनी प्रस्तुत आणि स्वर्ण पट कथा आणि प्रजाकार प्रोडक्शन्स यांच्या सहयोगाने येणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे निर्माते सुनील नारकर असून सहनिर्माते सेजल दिपक पेंटर आणि प्रसाद महादेव खांडेकर आहेत. चित्रपटाचे लेखन प्रथमेश शिवलकर, प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. छायांकन गणेश उतेकर यांचे तर संगीत रोहन रोहन यांचे आहे. धमाल मस्तीचा 'चिकी चिकी बुबूम बुम' प्रेक्षकांसाठी एक वेगळीच ट्रीट असणार आहे.


# शिक्षणाचे माध्यम कोणते असावे ?

ज्योतिर्मय साहित्य

आज शिक्षणाला कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणातूनच आपल्या पाल्याचे भवितव्य घडत असते. त्यामुळे पाल्याला कोणत्या माध्यमातून शिक्षण द्यावे असा प्रश्न पालकांसमोर उभा राहतो. मराठी, सेमी की इंग्रजी माध्यम निवडावे याविषयी मनात गोंधळ किंवा संभ्रमावस्था निर्माण होते. आणि आजूबाजूची मुले जर इंग्रजी माध्यमात शिकत असतील तर निर्णय घेणे जास्तच अवघड बनते.

कोणत्या माध्यमातून शिकावे हा ज्याच्या त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे.कोणतेही माध्यम निवडण्यापूर्वी आपल्या पाल्याची नैसर्गिक क्षमता, बुद्धिमत्ता आणि कुवत अजमावून बघणे गरजेचे असते. पाल्य शाळेत जाण्यापूर्वी घरीदारी सतत आपल्या सोबत असतो. त्यामुळे त्याच्या आवडी निवडी, स्वभाववैशिष्ट्ये, चांगल्या बाबी अथवा कमकुवतपणा पालक म्हणून आपल्याला ज्ञात असतो. शाळा किंवा माध्यम निवडताना याचा चांगला उपयोग होऊ शकतो. आपला पाल्य कोणत्या माध्यमात चांगला शिकू शकेल हे आईवडील म्हणून पालकांना समजले तर पुढील अनेक समस्या टाळल्या जातात.

शेजारचा मुलगा अमुक माध्यमात शिकतोय म्हणून आपल्या पाल्याला त्याच माध्यमात शिकविण्याचा अट्टाहास करु नये.प्रत्येक मूल हे वेगळे असतो.प्रत्येकाच्या क्षमता भिन्न असतात. त्यामुळे इतर मुलांबरोबर आपल्या पाल्याची तुलना करु नये.


विद्यार्थ्यांशी हितगुज
लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

काळानरुप शिक्षणात नवनवीन बदल होत आहेत. जागतिकीकरणाच्या रेट्यात इंग्रजीचे महत्त्व वाढले आहे. प्रत्येक पालकाला वाटते माझा पाल्य इंग्रजी माध्यमातून शिकला पाहिजे. अशी इच्छा बाळगणे काही चुकीचे नाही. त्याचबरोबर आपल्या पाल्याची बौद्धिक क्षमता, त्याच्या अभ्यासासाठी घरातील व परिसरातील लागणारे पूरक वातावरण पाहणे गरजेचे आहे. माध्यम कोणतेही निवडा पण आपला पाल्य, त्याच्या क्षमता याचा विचार जरुर करा.

शिक्षणतज्ज्ञ व शिक्षण क्षेत्रातील जाणकारांच्या मते मातृभाषा हे शिक्षणाचे उत्तम माध्यम आहे. मातृभाषेतून शिकल्याने अनेक मूलभूत संबोध, संकल्पना व आशयज्ञान याचे आकलन लवकर होते. चर्चे तून व एकमेकांच्या सहकार्याने मुले आनंदाने शिकतात.

स्वयंअध्ययन करतात. कोणतेही माध्यम चांगले अथवा वाईट नसते. आपला पाल्य त्या माध्यमात स्वतःला कसा सिद्ध करतो यावर माध्यमाचे यश अवलंबून असते.

शिक्षणासाठी माध्यम निवडताना आपल्या पाल्याची इतरांबरोबर तुलना न करता त्याला कोणत्या माध्यमात शिकवावे हे आपण विचार करुन ठरवावे. जेणेकरुन त्याची शैक्षणिक जडणघडण उत्तम होईल.

***







## भेळ पंढरपूरी....

भेळ भेळ भेळ
चवदार भेळ...।।
चिवड्याची भेळ
ओली सुकी भेळ....।।
खाण्यासाठी खास
संध्याकाळ आस....।।
चुरमुरे शेव
दाळे शेंगदाणे.....।।
तिखट घालून
वरती मसाले.....।।
घम-घमणारी
कडक फोडणी....।।
घोळून चोळून
चिवडाच झाला......।।
कांदा कैरी खिस
वरती पेरला.......।।
सुगंध वाढवी
कोथिंबीर खरी......।।
पाणीपुरी अशी
तोंड भर मावी.....।।
कचोरी रगडा
चवीची श्रीमंती......।।
बाबांच्या खिशाला
खात्रीशीर कात्री......।।

**- दत्ता तरलगट्टी सर**
पंढरपूर

## धरतीची आम्ही लेकरं

धरतीची आम्ही लेकरं
धरतीचे करू रक्षण
धरती अमुची माता
सदैव करूया पूजन

धरती माता करी
हिरव्या निसर्गाचं संगोपन
हिरव्या वनराईत असे
पशु पक्षांचे वस्तीस्थान

धरती मातेच्या कुशीत
नद्या झरे खेळती
सप्त समुद्रातून धरतीला
पावसाचे अमृतकुंभ मिळती

अन्नधान्याचे दान धरती
सदैव लेकरांना देई
नाना प्रकारच्या फुला फळांचा
आस्वाद लेकरं घेई

सुंदर समृद्ध धरतीचा
अमुच्या मनात आदर
धरतीच्या रक्षणार्थ आम्ही लेकरं
सदैव करूया जागर

**- सुनिल माथने**
अकोला. मो.९४०३२८२९७०

## न्याय अन्याय

माणसातली माणुसकी संपली सारी आता
माणसातला हिंस्र पशु जागा झाला आता

प्राण्यांना सुध्दा कळते प्रेमाची प्रेमळभाषा
मग माणूस का वागतो होऊनी वेडापिसा

ना आहे अधिकार त्यास कुणास मारण्याचा
गुन्हेगारास कठोर शिक्षा उपाय हाच साचा

खरे काय खोटे काय कुणी न बघती येथे
निष्पापांचे जीव मात्र फुकट जाती येथे

न्यायदेवतेचा न्याय होतो आंधळा पांगळा
पामरांना कधी मिळेल न्याय इथे चांगला

**मधुकर ए. निलेगावकर, पुणे**
९४२१३७५६९१

## असेही कुंभ...

समुद्रमंथन कुणी पाहिले ?
स्नानाशिवाय काय राहिले ?

बोकाळले असे उपटसूंभ
म्हशिंची आंबोण तसे कुंभ..!!

आखाड्यात झिंगले नग्न
अवशेष उरले वांझ भग्न...!!

नेहमी ठेवूनी गहाण बुद्धी
अपराधाची होईल का शुद्धी ?

मोकाट सुटले बेछुट मलंग
सायं खेळण्या हवे पलंग..!!

पूर्वापारच यांची बुद्धी मंद
त्यात केसरी गुलालाचा छंद..!!

गळ्यात सळसळता साप
कोण असेल यांचा बाप..?

**-राम कोत्तापल्ले**

## पानगळ

लागे वसंत चाहूल
होई सारी पानगळ
मना पडे की रे भूल
पानांची ती सळसळ

पानगळ होई अती
हेमंत ऋतू सुरुवात
थांबे ती पर्ण गळती
शिशिरऋतू शेवट

वसंताची ती चाहूल
नवी पालवी फुटेल
मना लावी ते वेड
धरा सुंदर नटेल

वसंत आवडे ऋतु
सर्वांना तो देखणा
मनी वाटे तो रे हेवा
प्रेमी जीव रे भावना

पानगळ ती पानांची
सूचक ती रे मृत्यूची
जीवनाच्या प्रवासाची
पायरी ती शेवटची

**- सौ. जयश्री अर्जुन मुंडे**
अंबाजोगाई

## राम कृष्ण (अभंग)

ओढ जीवापरी । भक्तीची ती आस
लागलास ध्यास । हरिनामा १

तुझीया नामात । होऊनीया दंग
भक्तीचा तो रंग । जीवनात २

तुझा तो महीमा । आहे पंरपार
र्जावन हे सार । तुझ पायी ३

जीवन त्यागून । जपले मी माळ
कर्मा आले फळ । पांडुरंगा ४

राम कृष्ण हरि । करूनीया थोडी
लागुनीया गोडी । तुझ नामे ५

**- जगन्नाथ जाधव**
औरंगाबाद

## जगणेच असे आहे

आताशा मी माझ्याशीही भांडत नाही
माझे सोडा,कुणालाही दुखवत नाही

सूर्यास्ताच्या निस्तेज संध्याप्रकाशात
थकलेले -भागलेले चेहेरे बघवत नाही

किती ताण सहन करिते मन बिचारे
वेदना सांगाव्या असे जवळचे नाही

आरशात पाहता प्रतिबिंब खंगलेले
उसने अवसान शरीरात उरत नाही

भरजरी आसमंत मनाला भुलवितो
निर्धना यातले काही मिळणार नाही

लोकांचे काय बाबा,असे मजेत ते
पहाण्या कुणाकडे त्यास वेळ नाही

हे रडगाणे आहे ,नका समजू तुम्ही
जगणे ज्यांचे असे, त्यांना गत्यंतर नाही

कवी- अरुण वि.देशपांडे-पुणे
९८५०१७७३४२

हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559